लोकमत पू. पान क्र. १

# पोलिसांचे निवडणूक ऑल आउट ऑपरेशन

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने आचारसंहिता लागू झाली असून, मीरा-भाईंदरमध्ये पोलिसांनी ऑल आऊट ऑपरेशन राबवत कारवाया केल्या.

पोलिस आयुक्त मधुकर पाण्डेय, अपर पोलिस आयुक्त श्रीकांत पाठक यांच्या मार्गदर्शनाखाली मीरा-भाईंदर परिमंडळ-१ चे पोलिस उपायुक्त प्रकाश गायकवाडसह परिमंडळ १ मधील सर्व सहायक आयुक्त, वरिष्ठ पोलिस निरीक्षक, पोलिस अधिकारी - कर्मचारी यांनी ऑल आउट कोबिंग ऑपरेशन व नाकाबंदी राबवण्यात आली होती. ऑल आउट कोबिंग ऑपरेशनदरम्यान ५ वॉरंटमधील व फरारी २ आरोपी यांना अटक करण्यात आली.

## अचानक नाकाबंदी

- अमली पदार्थ विरोधी कायद्याखाली ११ गुन्हे दाखल करण्यात आले. तर १७ जणांवर सी.आर.पी.सी. १०७ प्रमाणे प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली. दारुबंदी कायद्यान्वये ६ गुन्हे दाखल करण्यात आले, कोप्ताअंतर्गत १५ अदखलपात्र गुन्हे दाखल केले.
- गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या १७ हिस्ट्रीशिटर यांची तपासणी केली. शहरात राहणारे ८ विदेशी नागरिक तपासले तर ७ तडीपार इसमाची माहिती घेण्यात आली. शहरातील ५४ ऑर्केस्ट्रा बार व लॉजेस तपासण्यात आले होते.
- पोलिसांनी १९ विविध ठिकाणी अचानकपणे नाकाबंदीचे लावली. नाकाबंदीच्या वेळी ३९७ संशयित वाहने तपासण्यात आली असून, मोटार वाहन कायद्यान्वये १४९ . केसेस करण्यात आल्या आहेत.

# वेश्याव्यवसायातून दोन महिलांची सुटका

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील एका ढाब्याजवळ वेश्याव्यवसाय करणाऱ्या दोन पीडित महिलांची शुक्रवारी सकाळी सुटका करण्यात नालासोपारा अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक पथकाला यश मिळाले आहे.

आरोपी सुरेखा बोराडे (२८) या वेश्यादलाल महिलेने ३० ते ३४ वर्षीय पीडित महिलांना स्वतःच्या फायद्यासाठी पैशाचे आमिष दाखवून पुरुष ग्राहकांकडून पैसे स्वीकारले.

पीडित महिलेकडून वेश्याव्यवसाय करून घेऊन यातून मिळणारे कमिशन म्हणून पैसे स्वीकारताना ती दलाल पोलिसांना मिळून आली आहे. पोलिस हवालदार पूनम जगदाळे यांनी शनिवारी नायगांव पोलिस ठाण्यात तक्रार देऊन गुन्हा दाखल केला आहे.

# विष पिऊन आत्महत्या

नालासोपारा : नागिनदास पाड्यातील टाकी रोड येथे राहणाऱ्या ओंकार धावस (१३) या अल्पवयीन मुलाने विषारी औषध पिऊन आत्महत्या केली आहे. शुक्रवारी त्याने विषारी औषध प्याल्यामुळे त्याला उलटी झाली. त्याला उपचारासाठी मनपा हॉस्पिटलमध्ये दाखल केले होते. त्यानंतर त्याला पुढील उपचारासाठी खासगी हॉस्पिटलमध्ये दाखल केले. तिथे त्याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. तुळींज पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

# शिक्षकाची फसवणूक

नालासोपारा : शांतीपार्क परिसरातील भावेश अपार्टमेंटमध्ये राहणारे शिक्षक कालीपदो पुरकाईत (५८) यांची वीज बिल अपडेटच्या नावाखर लाखोंची फसवणूक झाली आहे. घटनेच्या दिवशी ते बोरीवली येथील डॉन बॉस्को शाळेत असताना त्यांच्या मोबाइलवर वीज बिल अपडेट नसल्याने वीज घालविण्यात येईल, असा मेसेज आला. त्यानंतर तुमचे वीज बिल वेळोवेळी तयार होत नाही, त्यामुळे १०० रुपये खात्यात टाकून अपडेट करावे लागेल, असा मेसेज पाठवून एक लिंक पाठवली. त्या लिंकवर ऑनलाइन १०० रुपये पेमेंट करण्यास सांगितले. त्यानंतर आरोपीने लिंकद्वारे त्यांच्या क्रेडिट कार्डच्या डिटेल्सचा गैरवापर करून २ लाख ३४ हजार ५१ रुपये ऑनलाइन काढून फसवणूक केली. यासंदर्भात नालासोपारा पोलिसांनी रविवारी गुन्हा दाखल केला आहे.

# तरुणाचा अपघाती मृत्यू




नालासोपारा : शनिवारी रात्री अडीच वाजेच्या सुमारास आदर्श शेट्टी (२४) हा दुचाकीवर मित्र प्रदीप यादव (२५) याला बसवून नालासोपारा ब्रिजवरून येत होता. ओव्हर ब्रिजवर आदर्शने दुचाकी वाहतुकीच्या नियमांकडे दुर्लक्ष करून निष्काळजीपणाने भरधाव वेगात चालवून ब्रिजवरील संरक्षक भिंतीला धडकल्याने अपघात झाला. या अपघातात पाठीमागे बसलेल्या प्रदीपच्या डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने त्याचा मृत्यू झाला आहे. तुळींज पोलिसांनी दुचाकीचालक आदर्श याच्यावर रविवारी गुन्हा दाखल केला.

# अल्पवयीन मुलीचे अपहरण



नालासोपारा : मनवेलपाडा गावात राहणाऱ्या तेरा वर्षांच्या अल्पवयीन मुलीचे शनिवारी अपहरण झाले आहे. ती घटनेच्या दिवशी घरातून दुकानात जाते असे सांगून बाहेर पडली. पण ती घरी परतलीच नाही. कोणी अज्ञात आरोपीने तिच्या अज्ञानपणाचा फायदा घेऊन तिला कशाचे तरी आमिष दाखवून पळवून नेल्याची तक्रार तिच्या नातेवाईकांनी शनिवारी विरार पोलिस ठाण्यात देऊन गुन्हा दाखल केला आहे.

CamScanner
CamScanner

लोकमत पु. पान क्र. 2

# जिल्ह्यात पारंपरिक होळी-धुळवड, समुद्रकिनाऱ्यांवर पर्यटकांची गर्दी


## वसई-विरार शहरात पोलिसांचा जागोजागी बंदोबस्त तैनात

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : वसई-विरार शहरात होळीचा सण पारंपरिक पद्धतीने साजरा करण्यात आला, तर सोमवारी धुळवड मोठ्या प्रमाणात साजरी करण्यात आली. धुळवड साजरी करण्यासाठी वसईच्या समुद्रकिनाऱ्यावर गर्दी झाली होती, तर कुठलाही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिसांनी शहरात जागोजागी बंदोबस्त तैनात केला होता.

वसईच्या ग्रामीण भागात पारंपरिक पद्धतीने होळीचा सण साजरा केला जातो. होळीची विधिवत पूजा करून पुरणपोळीचा नैवेद्य दाखवल्यानंतर रविवारी रात्री उशिरा होळी पेटवण्यात आली.

धुळवडीसाठी वसई-विरारमधील रिसॉर्ट हे गेल्या काही दिवसांअगोदरच बुक करण्यात आले होते. तसेच समुद्र किनारीदेखील पर्यटकांची मोठ्या प्रमाणात गर्दी पाहायला मिळाली.



### उत्सवाला गालबोट नाही

- धुळवड साजरी करताना रंगाचा बेरंग होऊ नये यासाठी मद्यपान करून वाहने चालविणाऱ्यांवर पोलिसांची करडी नजर होती.
- उत्सवाला कोणतेही गालबोट लागू नये यासाठी होळीसाठी पोलिसांनी विशेष पथके स्थापन करून जागोजागी बंदोबस्त ठेवला होता.
- फिरती गस्त आणि नाकाबंदी करण्यात आली होती. मद्यपी वाहनचालकांविरोधात वाहतूक पोलिसांनी रविवारपासूनच मोहीम उघडली होती.

### बच्चेकंपनीने लुटला आनंद

शहरातील अनेक इमारतींच्या आवारात सोमवारी धुळवड साजरी झाली, मात्र अनेक ठिकाणी फुग्यांऐवजी प्लास्टिक पिशव्यांचा वापर होत असलेला दिसून आला.

धुळवडीत लोकांनी नैसर्गिक रंग वापरून होणारा पाण्याचा अपव्ययही टाळला होता. बच्चे कंपनीने मोठ्या प्रमाणात धुळवड साजरी करून मनमुराद आनंद घेतला.

CamScanner
CamScanner

लोकमत पु. पान क्र. ३

# वाहनाची नंबर प्लेट अस्पष्ट असल्यास होणार दंड वसूल

## नियमांचे पालन होणे आवश्यक : वाहतूक पोलिसांचे आवाहन

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : वाहतूक नियमांचे पालन करणे आवश्यक आहे. मात्र, काही जण तर नियम तोडून पळून जातात. पळून जाणाऱ्या चालकांच्या वाहनावरील नंबर प्लेटचा वाहतूक पोलिस फोटो काढतात. परंतु अनेक वाहनांवर नंबर प्लेट चुकीच्या पद्धतीने लावलेली असते किंवा त्यावरील नंबर अस्पष्ट असतो. अशी नंबर प्लेट आढळल्यास त्या वाहनांवरही दंड आकारून अशा वाहनमालकांवर कारवाई केली जाते. त्यामुळे वाहनाचा नंबर स्पष्ट दिसेल, अशा स्वरूपात नंबर प्लेट लावणे गरजेचे आहे.

दुचाकी असो की अन्य कोणतेही वाहन असो, त्याच्या नंबर प्लेटवरील नंबर अस्पष्ट असू नये, नंबर प्लेट तुटलेली असू नये, सोबतच नवीन कोणतेही कर्णकर्कश हॉर्न वाहनाला लावू नयेत, शिवाय सायलेन्सरमध्ये बदल करून त्या जागी विविध प्रकारच्या आवाजाचे हॉर्न आणि सायलेन्सर लावू नयेत, असे अनेक नियम आहेत. मात्र अनेक जण वाहतूक नियमांचे उल्लंघन करतात आणि अशा वाहनचालकांना वाहतूक पोलिसांच्या कारवाईला सामोरे जावे लागते.



### मागील तीन महिन्यांत अनेकांवर कारवाई

वाहतूक शाखेकडून वाहनाची नंबरप्लेट अस्पष्ट असलेल्या वाहनधारकाविरुद्ध कारवाई केली जाते. यामध्ये संबंधिताला पाचशे रुपयांचा दंड आकारला जातो. अशा प्रकारच्या विविध कारवाई शहरासह परिसरात मागील तीन महिन्यांत करण्यात आल्या आहेत.

### विरार वाहतूक शाखेने केल्या १७२ केसेस

विरार वाहतूक शाखेने १ जानेवारी ते २४ मार्च दरम्यान नंबर प्लेट नसलेल्या, तुटलेल्या नंबर प्लेट, फॅन्सी नंबर प्लेट लावणाऱ्या वाहनचालकाविरुद्ध १७२ केसेस करून ९५ हजारांचा दंड वसूल केला आहे.

### नंबर प्लेट कशी असायला हवी?

आरटीओ विभागाने निश्चित केलेल्या निर्देशानुसार सर्व वाहनांना नंबर प्लेट असणे गरजेचे आहे. हाय सिक्युरिटी नंबर प्लेट सोबतच त्या नंबर प्लेटची जागा, आकार याचेही नियम आहेत. हे नियम पालन करणे गरजेचे आहे अन्यथा असा कारवाई केली जाते.

### कागदपत्रे बाळगा

दुचाकी असो की कोणतेही वाहन असो. संबंधित चालकाने स्वतःचे वाहन चालविण्याचे परवानासोबत वाहनाची इतर आवश्यक कागदपत्रे, विविध प्रकारचे कर भरल्याच्या पावत्या, आरसी बुक हे सांभाळणे गरजेचे आहे. कागदपत्रे सोबत बाळगावी, जेणेकरून ज्या ठिकाणी तपासणी मोहीम होते. अशावेळी पोलिसांना ही कागदपत्रे दाखविणे सोपे जाऊ शकते.

### ...तर कारवाई

वाहनाच्या हॉर्न, सायलेन्सरमध्ये छेडछाड करणे, नंबर प्लेट अस्पष्ट किंवा चुकीची असेल, तसेच नंबर प्लेट नसणे अशा बाबींवर विशेष लक्ष दिले जाते. सर्वांनी नियम पाळले पाहिजे. नियम मोडल्यास कारवाई केली जाते.

- प्रशांत लांगी, पोलिस निरीक्षक, वाहतूक विभाग, विरार

### सिक्युरिटी नंबर प्लेट आवश्यक

- कागदपत्र तपासणीबरोबरच नियम मोडल्यानंतर वाहनधारकांकडून दंड वसूल केला जातो. हाय सिक्युरिटी नंबर प्लेट असणे आवश्यक असते.
- अशी नंबर प्लेट अनेकजण लावत नाहीत. जुन्या वाहनांच्या बाबतीत हे प्रकार आढळून येतात. अशावेळी पोलिसांकडून संबंधित वाहनाला दंड लावला जातो.

CamScanner
CamScanner

लोकमत पू. पान क्र. ३



# मंदिरात चोरी करताना हटकले, सुरक्षारक्षकालाच केली मारहाण

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : विरारच्या यशवंत नगरमधील विराट विनायक मंदिरात शनिवारी रात्री चोरी झाली आहे.

दोन चोरट्यांनी मंदिराच्या दरवाजाचा कडीकोयंडा स्क्रू ड्रायव्हर आणि हातोडीने उचकटून मंदिरात प्रवेश केला व मंदिरातील २० ते २५ हजारांची रोख रक्कम चोरी करत होते. त्यावेळी सुरक्षा रक्षक पीटर सालडाना (७२) यांनी चोरट्यांना हटकले. तेव्हा एका चोरट्याने त्यांच्या जवळ येऊन डोक्यात हातोडी मारून दुखापत केली व जीवे ठार मारण्याची धमकी दिली. त्यांना शांत राहण्यास सांगून त्यांचा १० हजारांचा मोबाइल, १ हजारांची टॉर्च जबरदस्तीने काढून घेत चोरटे पळून गेले. पीटर यांनी रविवारी विरार पोलिस ठाण्यात तक्रार दिल्याने गुन्हा दाखल केला आहे.

# कंपनीची फसवणूक; गुन्हा दाखल

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : वालीव फाटा येथील श्रीहरी इंडस्ट्रीयल ब्लू चिपजवळील गाळा नंबर २१ मध्ये गुप्ता अँड सन्सचे मालक प्रदीप गुप्ता याने महिन्द्रा अँड महिन्द्रा कंपनीच्या उत्पादनाची हुबेहूब नकली उत्पादने बनावट आऊटर बॉक्समध्ये भरून सीलबंद केली.

त्यावर बनावट एमआरपी स्टिकर लावून ते अवैधरीत्या विक्रीस ठेवून कंपनी व खरेदीदारांची फसवणूक केली. तसेच महिन्द्रा अँड महिन्द्रा कंपनीच्या स्वामित्व हक्काचा भंग केला म्हणून प्रदीप गुप्ता यांच्याविरुद्ध ४ लाख ४१ हजार २५ रुपयांची फसवणूक केली म्हणून वालीव पोलिसांनी शनिवारी गुन्हा दाखल केला आहे.

लोकमत पू. पान क्र. ५

# दुकान फोडून पावणेसतरा लाखांचे मोबाइल चोरले

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : भाईंदर पूर्वेच्या मुकुंद कॉम्प्लेक्समध्ये राहणारे चिराग जगदीश अनडा यांचे भाईंदर पश्चिमेस खाऊ गल्लीजवळ अल्पेश इमारतीत जे जे मोबाइल नावाचे मोबाइल विक्रीचे दुकान आहे. या दुकानाचा कर्मचारी मयूर गांधी हा सकाळी दुकान उघडण्यासाठी गेला असता दुकानाच्या भिंतीलगतची प्लाय आणि लोखंडी ग्रिल तोडून आत शिरून चोरट्याने मोबाइल चोरल्याचे आढळले.



विविध कंपन्यांचे २४ मोबाइल चोरीला गेले असून त्याची किंमत १६ लाख ७१ हजार असल्याचे भाईंदर पोलिस ठाण्यात दाखल गुन्ह्यात नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी वरिष्ठ पोलिस निरीक्षक सूर्यकांत नाईकवाडी यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक निरीक्षक माने हे तपास करत आहेत.

# मीरा रोडमधून दुचाकी चोरीला

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : मीरा रोडच्या रामदेव पार्क येथील सिल्वर स्प्रिंगमध्ये राहणारे धनसुख गौरा यांनी त्यांची दुचाकी मीरा रोड रेल्वे स्थानकाजवळ शांती शॉपिंग सेंटरबाहेर सार्वजनिक रस्त्यावर सकाळी उभी केली होती. सायंकाळी ते कामावरून आले असता दुचाकी चोरीला गेल्याचे आढळून आले. याप्रकरणी नयानगर पोलिस ठाण्यात ३५ हजाराच्या दुचाकी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

CS CamScanner

लोकमत पू. पान क्र. ५

# फसगत झालेली रक्कम पोलिसांनी दिली मिळवून

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : जास्त पैशांच्या आमिषाने ऑनलाइन गुंतवणूक करून ८ लाखांची फसगत झालेल्या महिलेस त्यातील ५ लाख रुपये परत मिळवून देण्यात मीरा-भाईंदर-वसई विरार पोलिसांच्या सायबर पोलिस ठाण्याला यश आले आहे.

दलाल आडनावाच्या महिलेस ऑनलाइन गुंतवणुकीत चांगला फायदा करून देण्याचे आमिष दाखवून सायबर लुटारूंनी त्यांची ऑनलाइन ८ लाख ३ हजार रुपयांना फसवणूक केली होती. सायबर पोलिस ठाणे येथे त्यांची तक्रार आल्यानंतर १७ डिसेंबर २०२३ रोजी नवघर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

## पाच लाख रुपये गोठवण्यात मिळाले यश

गुन्हे शाखेचे पो.उपायुक्त अविनाश अंबुरे, सहायक पोलिस आयुक्त मदन बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर पोलिस ठाण्याचे निरीक्षक सुजितकुमार गुंजकर, सहायक निरीक्षक स्वप्निल वाव्हळ, उपनिरीक्षक प्रसाद शेनोळकरसह प्रवीण आव्हाड, गणेश ईलग, पल्लवी निकम, प्रशांत बोरकर, प्रवीण सावंत व सोनाली मोरे यांच्या पथकाने तांत्रिक विश्लेषण केले. दलाल यांची फसगत झालेली रक्कम ज्या बँक खात्यात जमा होती ती गोठवण्यासाठी पत्रव्यवहार करत ५ लाखांची रक्कम गोठवण्यात यश आले. ठाणे न्यायालयाच्या आदेशाने ५ लाखांची रक्कम दलाल यांच्या बँक खात्यात पुन्हा वळती करण्यात आली.



बावखळ येथील औद्योगिक वसाहतीतील कारखान्याला आग लागून कारखान्याचे मोठे नुकसान झाले.

# बावखळमधील कारखान्याला आग

लोकमत न्यूज नेटवर्क

पारोळ : मुंबई-अहमदाबाद महामार्गालगतच्या बावखळ येथील औद्योगिक वसाहतीतील कारखान्याला आग लागून कारखान्याचे मोठे नुकसान झाले. मात्र, होळीच्या सुटीमुळे कामगार नसल्याने जीवितहानी टळली.

पेल्हार पोलिस ठाण्याच्या हद्दीमध्ये बावखळ येथील कारखान्याला आग लागल्याने आगीचे लोट महामार्गावरूनही दिसत असल्याने परिसरात भीतीचे वातावरण पसरले होते. घटनेची माहिती मिळताच वसई-विरार अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेत एक तासाच्या प्रयत्नानंतर आग आटोक्यात आणली. शॉकसर्किटमुळे ही आग लागल्याचे कारण समोर आले आहे.

CamScanner
CamScanner

पुण्यनगरी पू. पान क्र. ५

# सायबर पोलिसांनी दोघांना मिळवून दिली फसवणुकीची रक्कम परत

## काशिमीरा पोलीस हद्दीतील प्रकार

**। मीरा रोड :** मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील काशिमीरा पोलीस ठाणे हद्दीतील एका व्यक्तीची व एका महिलेची ऑनलाइन फसवणूक करण्यात आली होती. याबाबत सायबर पोलीस ठाणे यांनी योग्य तपास करून दोघांना फसवणूक झालेली रक्कम परत मिळवून दिली आहे.

तक्रारदार सौरभ यांना त्यांच्या क्रेडिट कार्डाचे व्यवहार सुरू ठेवायचे असल्यास मोबाइलवर पाठवलेल्या लिंकमध्ये कार्डची माहिती भरायला सांगितली. त्यांनी ती माहिती भरून पाठवल्यावर त्यांच्या खात्यातून रक्कम कमी झाल्याचे निदर्शनास आले. तक्रारदाराने आर्थिक फसवणूक झाल्याची तक्रार सायबर पोलीस ठाण्यात केली आहे. याची दखल घेत तक्रारदाराच्या व्यवहाराची माहिती गोळा करण्यात आली.



फसवणूक रक्कम नोडल ऑफिसर क्रेडिट कार्ड इंडिसइंड बँकेच्या मर्टंडच्या अकाऊंटवर गेल्याचे दिसून आले. सायबर पोलीस ठाणे यांनी तात्काळ पत्रव्यवहार करून व सातत्यपूर्ण पाठपुरावा करून फसवणूक रक्कम रोखली. थांबविण्यात आली. पाठपुराव्यामुळे फसवणूक झालेली २ लाख १० हजार १६८ रुपये पुन्हा तक्रारदारांना मिळवून देण्यात आले.

दुसरी घटनाही काशीमिरा पोलीस ठाणे हद्दीतलीच आहे. तक्रारदार शबाना यांच्या क्रेडिट कार्डचे रिडीम पॉइंट खात्यात जमा करावयाचे असल्याचे सांगितले. नंतर तक्रारदाराच्या मोबाईलवर प्राप्त ओटीपीची माहिती घेऊन आर्थिक फसवणूक केल्याची तक्रार सायबर पोलीस ठाण्यात करण्यात आली होती. महिलेच्या बँकेतून झालेल्या व्यवहाराची माहिती गोळा करण्यात आली. फसवणूक झालेली रक्कम पायु पेमेंट्स हौसिंग च्या अकाऊंटवर गेल्याचे आढळले. पोलिसांनी तपास करून फसवणूक झालेली रक्कम १ लाख १ हजार ४१६ रुपये पुन्हा मिळवून दिली आहे.

## आमिष दाखवून महिलेला घातला गंडा

**। मीरा रोड :** काशिमीरा परिसरातील महिलेला शेअर मार्केटमध्ये ऑनलाइन गुंतवणूक करण्यास सांगून १० लाख २९ हजार ३१२ रुपयांची

फसवणूक केली होती. ती संपूर्ण रक्कम महिलेला काशिमिरा पोलिसांनी तपास करून परत मिळवून दिली आहे. तक्रारदार प्रियंका दास पूजा यांना शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक केल्यास अधिक नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवून आर्थिक फसवणूक केली होती. या फसवणुकीच्या अनुषंगाने काशिमीरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. याबाबत तात्काळ दखल घेऊन तक्रारदाराच्या व्यवहाराची माहिती प्राप्त करण्यात आली. रक्कम वेगवेगळ्या बँक खात्यात वळती झाल्याचे दिसून आले. त्या अनुषंगाने तक्रारदारांची रक्कम गोठवण्यासंबंधित बँकेसोबत पत्रव्यवहार करून संशयित खात्यात रक्कम गोठवण्यात आली. नंतर न्यायालयाकडून तक्रारदाराची रक्कम परत मिळण्यासाठी काशिमीरा पोलीस ठाणे अधिकारी, अंमलदारांनी पाठपुरावा केला. तक्रारदाराची फसवणूक झालेली रक्कम १० लाख २९ हजार ३१२ रुपये त्यांच्या खात्यावर परत मिळवून दिली.

लोकसत्ता पू. पान क्र. १

# वसई-भाईंदर रो-रो सेवेच्या बोटीत मद्य मेजवानी

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**वसई :** वसई-भाईंदर दरम्यानच्या रो-रो सेवेतील प्रवासी बोटीत मद्य मेजवानी प्रकरणात अद्याप कोणावरही गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही. रविवारी आरोही बोटीत मद्य मेजवानी सुरू असल्याची चित्रफीत प्रसारित झाली होती. यामुळे नागरिकांमधून संताप व्यक्त होत आहे.

वसई-भाईंदर जलमार्गाने जोडण्यासाठी महाराष्ट्र सागरी मंडळातर्फे रो-रो सेवा सुरू करण्यात आली आहे. रविवारी भाईंदर जेट्टीजवळ उभ्या करण्यात आलेल्या 'आरोही' या फेरीबोटीमध्ये काही तरुण मद्यपान करत असल्याची चित्रफीत समाजमाध्यमावर पसरली होती. 'आरोही' नावाच्या बोटीत रात्रीच्या सुमारास बसून तरुण मोठ्या आवाजात गाणी लावून मद्यपान करत असल्याचे चित्रफितीमध्ये दिसून येत आहे. हा प्रकार उघडकीस येताच महाराष्ट्र सागरी मंडळाने मात्र सावध भूमिका घेतली आहे. हा प्रकार प्रवासी सेवेदरम्यान घडला नसल्याचे महाराष्ट्र सागरी मंडळाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. बोटमालकाने त्यांच्या परिचयातील व्यक्तीला वाढदिवस साजरा करण्यासाठी परवानगी दिली होती. मात्र काही तरुणांनी त्यात मद्याची मेजवानी केली. ही शासनाची बोट नसून ती खासगी आहे. त्यामुळे त्याचे प्रवासी काम पूर्ण झाल्यानंतर त्याचा वापर कसा करावा हा प्रश्न बोटमालकाचा आहे, असे महाराष्ट्र सागरी मंडळाचे कार्यकारी अभियंता अविनाश पाटील यांनी सांगितले. मात्र सार्वजनिक ठिकाणी मद्यपान करणे गुन्हा असतानादेखील अद्याप कोणावरही गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही. आमच्याकडे कोणी तक्रार दाखल केली नसल्याने गुन्हा दाखल नसल्याचे भाईंदर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सूर्यकांत नाईकवाडी यांनी सांगितले.



### नियम काय?

महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमाच्या कलम ७, मनाई कलम २२, महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम १९४९ च्या कलम ६८(अ) (ब) ८४, ९८, १०३ अन्वये सार्वजनिक ठिकाणी मद्यप्राशन करणे गुन्हा आहे. कलम ८४ सार्वजनिक ठिकणी मद्यपान करणारा तसेच कलम ६८ आपली जागा मद्य पिण्यास देणाऱ्यावर गुन्हा दाखल होतो. गैरवर्तन आणि शिवीगाळ झाली तर कलम ८५ अन्वये गुन्हा दाखल होतो, असे राज्य उत्पादन शुल्क विभागाने सांगितले.

CamScanner
CamScanner

लोकसत्ता पू. पान क्र.4

## विद्यार्थिनी बेपत्ताप्रकरणी अपहरणाचा गुन्हा

**वसई :** दहावीची परिक्षा देण्यासाठी गेलेली १४ वर्षीय विद्यार्थिनी बेपत्ता झाल्याची घटना वसईत घडली आहे. याप्रकरणी वालीव पोलिसांनी अपहरणाचा गुन्हा दाखल केला आहे.

वसई पूर्वेच्या वालीव पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहणारी १४ वर्षीय मुलीची दहावीची परीक्षा सुरू होती. शनिवारी ती नेहमीप्रमाणे परीक्षा देण्यासाठी केंद्रावर गेली होती, मात्र दुपारी ती परतली नाही. तिच्या कुटुंबीयांनी सर्वत्र शोध घेतल्यानतंर पोलिसांत तक्रार दाखल केली. मुलगी अल्पवयीन असल्याने या प्रकरणी पोलिसांनी अपहरणाचा गुन्हा दाखल केला आहे.

वालीव पोलीस ठाण्याचे साहाय्यक पोलीस निरीक्षक हनीफ शेख याप्रकरणी तपास करत आहेत. तिला कुणीतरी फूस लावून पळवून नेल्याची शक्यता पोलिसांनी वर्तवली होती.

दरम्यान या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून वालीव पोलिसांनी सखोल तपास सुरू केला आहे.

पुढारी पू. पान क्र. 1

## अल्पवयीन मुलीवर अत्याचार

**पालघर :** माणिकपूर पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रात एका १४ वर्षीय अल्पवयीन मुलीवर सावत्र बापानेच अत्याचार केल्याची घटना घडली आहे. सावत्र बापाने हे कुकृत्य जानेवारी ते ऑगस्ट दरम्यान केल्याचे समोर आले आहे. सावत्र आईही या प्रकरणाकडे दुर्लक्ष करत होती. पीडितेसोबत सातत्याने अत्याचार होत असल्याने तिने शुक्रवारी माणिकपूर पोलीस ठाण्यात तक्रार दिल्यानंतर सावत्र बाप व आई या दोघांविरोधात गुन्हा दाखल झाला आहे.

## महामार्गावर लूट

**पालघर :** मुंबई-अहमदाबाद महामार्गावर एका वाहनातून दोन लाख चाळीस हजार रुपयांची मुद्देमाल चोरी झाल्याची घटना घडली आहे. महामार्गावर विरार फाटा पूल येथे गुरुवारी रात्री ह घटना घडली गोपाळ सहानी हे वापी येथून काही साहित्य घेऊन मुंबईकडे जात असताना खानिवडे टोल नाक्या जवळ एका कारने या टेम्पोला अडवले व टेम्पोची किल्ली जबरदस्तीने घेऊन प्रसार झाले. या प्रकरणी तक्रार दाखल होऊन गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## भावांचे अपहरण

**पालघर :** दोन सख्ख्या भावांचे अपहरण झाल्याची घटना पेल्हार पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली आहे. हे अपहरण गुरुवारी झाले असून धानिवबाग तलाव रामधनी नगर परिसरात राहणारी ही दोन्ही मुले आहेत. मुलांना अज्ञातांनी पळवून नेल्याची तक्रार मुलांच्या आईने शुक्रवारी दाखल केल्यानंतर पेल्हार पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## गोमांस पकडले

**पालघर :** सोपारा गावातील साईनगर रस्ता परिसरामध्ये १३०० किलो गोमांस पोलिसांनी जप्त केले आहे. टेम्पोमध्ये भरून विनापरवाना विक्रीसाठी घेऊन जात असताना पोलिसांनी ही कारवाई केली आहे. दोन लाख ३४ हजार रुपये किमतीचे गोमान्स व वाहन असा सहा लाख ३४ हजाराचा मुद्देमाल नालासोपारा पोलिसांनी जप्त केला असून फिरोज फौजी व सिकंदर शेख या दोघा विरोधात गुन्हा दाखल केला आहे

CS CamScanner

CS CamScanner

पुढारी पान क्र. ४

# महापालिकेकडून ट्राफिक वॉर्डनचा ठेका रद्द

## अवास्तव खर्च वाचविण्यासाठी वाहतूक शाखेची टोईंग वाहने देखील काढून घेणार

**भाईंदर : राजू काळे**

मिरा-भाईंदर महापालिकेची आर्थिक परिस्थिती खालावत असल्याने पालिकेने स्थानिक वाहतूक शाखेच्या सहकार्यासाठी स्वखचनि पुरविलेले सुमारे ५० हून अधिक ट्राफिक वॉर्डन्सचा ठेका गेल्या १ मार्चपासून रद्द केला. तर वाहतूक शाखेला नो पार्किंगमधील वाहने टो करण्यासाठी स्व खचनिच पुरविलेली टोईंग वाहने देखील येत्या १ एप्रिलपासून काढून घेण्यात येणार असल्याचे सुत्राकडून सांगण्यात आले.

शहरातील वाहतुकीच्या नियोजनासाठी पालिकेने काही वर्षांपूर्वी स्थानिक वाहतूक शाखेला सुमारे ५० हून अधिक ट्राफिक वॉर्डन्सचा पुरवठा स्वखचनि केला होता. यासाठी पालिकेच्या तिजोरीवर सुमारे पावणे दोन कोटींचा आर्थिक बोजा पडत होता. पालिकेने हे ट्राफिक वॉर्डन्स केवळ शहरातील वाहतुकीच्या नियोजनासाठी दिले असताना त्यांच्याकडून वाहतुकीच्या नियोजनासह वाहनचालकांकडून वाटमारी, अधिकार नसतानाही वाहनांची कागदपत्रे तपासणे आदी कामे केली जात होती. त्यावर तत्कालीन महासभेत अनेकदा ऊहापोह करण्यात आला असता हा ठेकाच रद्द करण्याची मागणी करण्यात आली होती. मात्र स्थानिक वाहतूक शाखेतील अपुऱ्या मनुष्यबळामुळे ट्राफिक वॉर्डनचा ठेका जैसे थे ठेवण्यात आला. याखेरीज पालिकेकडून वाहतूक शाखेच्या मागणीनुसार नो पार्किंगमधील वाहनांवरील कारवाईसाठी स्वखर्चातून जॅमर देखील पुरविण्यात आले. त्याचा लेखाजोखा सध्या उपलब्ध नसला तरी पालिकेने नो पार्किंगमधील वाहने टो करण्यासाठी आवश्यक ठरणारी टोईंग वाहनांचा देखील स्वखचनि पुरवठा केला. मात्र गेल्या काही महिन्यांपासून पालिका आर्थिक गर्तेत सापडली असताना तिची विस्कटलेली आर्थिक घडी नीट बसविण्यासाठी आयुक्त संजय काटकर यांच्याकडून अनावश्यक खर्च कपातीला सुरुवात करण्यात आली आहे.

अशातच मिरा-भाईंदर शहरात पोलीस आयुक्तालय सुरु झाल्यानंतरही पालिकेकडून स्थानिक वाहतूक शाखेला स्वखचनि पुरविलेल्या ट्राफिक वॉर्डन, जॅमर, टोईंग वाहनांच्या खर्चावर देखील आयुक्तांनी १ मार्चपासून नियंत्रण आणण्यास सुरुवात केली. या खर्चापोटी पालिकेच्या तिज-ोरीवर कोट्यवधींच्या खर्चाचा बोजा पडत असल्याने सुरुवातीला स्वखचनि पुरविण्यात आलेल्या ट्राफिक वॉर्डनचा ठेका पालिकेकडून रद्द करण्यात आला. तर यापुढे वाहतूक शाखेला जॅमर न पुरविण्याचा निर्णय घेत टोईंग वाहनांचा किमान निम्मा खर्च तरी वाहतूक शाखेकडून पालिकेला देण्यात यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

### वाहतूक शाखेला टोईंगची व्यवस्था करावी लागणार

हा खर्च येत्या १ एप्रिलपासून न मिळाल्यास पालिकेने स्थानिक वाहतूक शाखेला स्वखचनि पुरविलेल्या टोईंग वाहनांचा ठेका देखील रद्द करण्याचा निर्णय घेतल्याचे सुत्राकडून सांगण्यात आले. यावरून वाहतूक शाखेला स्वखचनिच टोईंग वाहनांची व्यवस्था करावी लागणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. पालिकेने ट्राफिक वॉर्डनचा ठेका रद्द केल्यानंतरही काही ठिकाणी वाहतूक कर्मचाऱ्यांच्या सहकार्यासाठी ट्राफिक वॉर्डन काम करताना दिसत असून त्याचा खर्च वाहतूक शाखा कि संबंधित कर्मचारी उचलतात, हे अद्याप गुलदस्त्यात आहे. तर टोईंग वाहनांच्या व्यवस्थेसाठी वाहतूक शाखेकडून अद्याप कोणताही निर्णय घेण्यात आला नसल्याचे सुत्रांकडून सांगण्यात आले.

CamScanner
CamScanner

आज होगा उद्धव के उम्मीदवारों का ऐलान देखें अंदर

NBT
नवभारत टाइम्स

'स्वादयुक्त भोजन है दवा जितना कारगर' p6

# ठगी के ₹2 लाख वापस मिले

**निसं, मीरा-भाईंदर:** मीरा-भाईंदर वसई-विरार (एमबीवीवी) पुलिस आयुक्तालय के अंतर्गत साइबर शाखा ने ऑनलाइन ठगी के मामले की जांच करते हुए 2 लाख 10,168 रुपये वापस हासिल करने में सफलता पाई है। शिकायतकर्ता सौरभ के क्रेडिट कार्ड से ऑनलाइन ठगी हुई थी। साइबर विभाग ने शिकायत मिलते ही क्रेडिट कार्ड जारी करनेवाले संबंधित बैंक से संपर्क कर ट्रांजैक्शन को रोक दिया था।

CamScanner